बचत अर्धशतकी निचांकावर

भारतीय कुटुंबांचा भर उसनवारीवर

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. सरलेल्या आर्थिक वर्षात म्हणजेच एप्रिल 2022 ते मार्च 2023 अखेर भारतातील घरगुती निव्वळ आर्थिक बचत 55 टक्क्यांनी घसरून सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) तुलनेत 5.1 टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. हा कौटुंबिक बचतदराचा 50 वर्षांतील नीचांकी स्तर आहे. आर्थिक वर्ष 2021 पासून कुटुंबांच्या कर्जभारात दुपटीने वाढ होऊनत्याचे प्रमाण 15.6 लाख कोटी रुपयांवर पोहोचले असल्याचेही उपलब्ध अधिकृत आकडेवारीचे विश्लेषण स्पष्ट करते.

एरव्ही बचत केला जाणारा उत्पन्नाचा मोठा हिस्सा भौतिक मालमत्तांच्या खरेदीसाठी वापरला गेल्याचे आकडेवारी दर्शविते. तर सरलेल्या आर्थिक वर्षात कुटुंबांवर एकत्रितरूपात 8.2 लाख कोटी रुपयांचा कर्जाचा डोंगर उभा राहिला, असे 'एसबीआय रिसर्च'चे विश्लेषण अहवाल सांगते. यातून समाजात नवनव्या आकांक्षा बाळगणारा वर्ग वाढत असल्याचे दर्शविले जात असले, तरी उत्पन्न स्तर फारसा न वाढल्याने उसनवारीवर या लोकांचा भर वाढल्याचे सूचित होत आहेत. 2022-23 मधील एकूण 8.2 लाख कोटींच्या कुटुंबावरील कर्जामध्ये, घरासाठीचे कर्ज आणि गृहोपयोगी वस्तू व उपकरणांच्या खरेदीसाठी घेतलेल्या किरकोळ कर्जाचे प्रमाण हे 7.1 लाख कोटी रुपये इतके आहे. आधीच्या आर्थिक वर्ष 2021 मध्ये जीडीपीच्या तुलनेत कुटुंबांच्या बचतीचे प्रमाण 11.5 टक्क्यांवर होते. तर करोना टाळेबंदीने ग्रस्त आर्थिक वर्ष 2020 मध्ये ते जीडीपीच्या तुलनेत 7.6 टक्के असते. सध्या त्याचे प्रमाण हे 5.1 टक्क्यांपर्यंत, 50 वर्षांच्या नीचांकी पातळीवर घसरले आहे. कोरोना महासाथीच्या काळापासून कुटुंबांवरील आर्थिक दायित्व उत्तरोत्तर वाढत जात ते 8.2 लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे आणि जे प्रथमच या काळातील एकूण 6.7 लाख कोटी रुपयांच्या आर्थिक बचतीला मात देणारेही ठरले आहे, असे स्टेट बँकेच्या मुख्य आर्थिक सल्लागार सौम्या कांती घोष यांनी म्हटले आहे.

मालमत्तेचा वाटा ७० पर्यंत वाढणार

आर्थिक मालमत्तेच्या बाजूने, या कालावधीत विमा, भविष्य निर्वाह निधी आणि पेन्शन फंडामध्ये 4.1 लाख कोटी रुपयांची भर पडली आहे. तर कुटुंबांच्या एकूण 8.2 लाख कोटींच्या दायित्वाच्यापैकी, 7.1 लाख कोटी रुपयांचे वाणिज्य बँकांचे कर्ज हे घर आणि घराच्या गरजांसाठी घेण्यात आले आहे. गेल्या दोन वर्षात घेण्यात आलेल्या किरकोळ कर्जाच्या 55 टक्के कर्ज घरकुल निर्मिती, शिक्षण आणि वाहन खरेदीसाठी घेण्यात आले आहे. व्याजदरात गेल्या काही वर्षात घसरण झाल्याने भौतिक मालमत्ता खरेदीसाठी मोठा निधी वळविला गेला. भौतिक मालमत्तेतील बचत, आर्थिक वर्ष 2012 मध्ये घरगुती बचतीच्या दोन तृतीयांशपेक्षा जास्त होती, ती आर्थिक वर्ष 2021 मध्ये 48 टक्क्यांपर्यंत घसरली. मात्र हा कल पुन्हा बदलत असून आणि वित्तीय साधनांमधील बचत पुन्हा कमी होत असून भौतिक मालमत्तेचा वाटा 70 पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.घरगुती कर्ज-ते-जीडीपी गुणोत्तरही करोनाकाळात वाढले, परंतु त्यानंतर ते घटले आहे. मार्च 2020 मध्ये ते जीडीपीच्या तुलनेत 40.7 टक्के होते, तर जून 2023 मध्ये 36.5 टक्क्यांपर्यंत खाली आले आहे.

'ग्लेनमार्क' ७५ टक्के भागभांडवल विकणार

निरमा ५६५१ कोटींना करणार खरेदी

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्सने 21 सप्टेंबर रोजी घोषणा केली की ते ग्लेनमार्क लाईफ सायन्सेसमधील 75 टक्के भागभांडवल निरमाला विकणार आहेत. हा करार 5,651 कोटी रुपयांना झाला असून याद्वारे 615 रुपयांना शेअर्सची विक्री केली जाईल. 21 सप्टेंबर रोजी ग्लेनमार्क लाइफ सायन्सेसचे शेअर्स 1.25 टक्क्यांच्या घसरणीसह 627.10 रुपयांवर बंद झाले. जीपीएलकडे ग्लेनमार्क लाइफसायन्सेसमध्ये 82.84 टक्के हिस्सा आहे.

यापूर्वी केकेआर, ब्लॅकस्टोन, बीपीईए ईक्यूटी आणि पीएजीने ग्लेनमार्क लाइफसायन्सेसचे भागभांडवल विकत घेण्यात स्वारस्य दाखवल्याचे वृत्त येत होते. या शर्यतीत निरमाही सहभागी झाल्याचे समोर आले आहे. निरमाने ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्समधील हिस्सा खरेदी

करण्यासाठी ऑगस्टमध्ये बाइंडिंग बोली सादर केली होती. अहमदाबाद येथे मुख्यालय असलेला निरमा कंपनी फार्मा क्षेत्रात प्रवेश करण्याचा प्रयत्नात असताना कॉन्ट्रॅक्ट डेव्हलपमेंट मॅन्युफॅक्चरिंग संस्था, बंगळुरू स्टेरिकॉन फार्मा प्रायव्हेट लिमिटेडमध्ये 100 टक्के हिस्सा खरेदी केला होता. नॉन-फार्मा कंपनी निरमा ग्रुपने ग्लेनमार्क लाइफ सायन्सेसच्या खरेदीवर कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक ग्लेन सलधाना म्हणाले, निरमा समूहासाठी फार्मा क्षेत्रातील ही एक मोठी झेप आहे.

QUICK NEWS

रॉडझेन यूएस स्टॉक एक्स्चेंज नॅसडॅकवर

वॉशिंग्टन. भारतीय स्टार्टअप रॉडझेन यूएस स्टॉक एक्स्चेंज नॅसडॅकवर सूचीबद्ध झाले आहे. रॉडझेन कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) द्वारे संचालित जागतिक वाहन विमा तंत्रज्ञान कंपनी म्हणून उदयास आली आहे. कंपनीने गुरुवारी नॅस्डॅकवर व्यापार सुरू केला. त्याचे सामाईक शेअर्स नॅसडॅक ग्लोबल मार्केटमध्ये आरडीझेडएन नावाने विकले गेले आणि त्याचे शेअर वॉरंट नॅसडॅक कॅपिटल मार्केटवर विकले गेले. आम्ही यूएस 800 अब्ज डॉलर्सच्या ऑटो इन्शुरन्स मार्केटला आकार देण्यासाठी एआयच्या परिवर्तनीय क्षमतेचा उपयोग करण्यास उत्सुक आहोत, असे रॉडझेनचे सीईओ रोहन मल्होत्रा यांनी सांगितले.

स्टेटिकची चार्जिंग स्टेशनसाठी भागीदारी

दिल्ली. इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) चार्जिंग सेवा प्रदाता स्टॅटिकने राष्ट्रीय राजधानीजवळील ग्रेटर नोएडामधील निवासी संकुलांमध्ये चार्जिंग स्टेशन्स उभारण्यासाठी नोएडा पॉवर कंपनी लिमिटेडसोबत प्रारंभिक करार केला आहे. आम्ही केवळ भारतातील सर्वात मोठे ईव्ही चार्जिंग नेटवर्क तयार करीत नाही, तर आमच्या सर्व ऑपरेशनल क्षेत्रांमध्ये विश्वसनीय ईव्ही चार्जिंग स्टेशन सुनिश्चित करण्यासाठी प्रगत हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर सोल्यूशन्स देखील तैनात करत आहोत, असे स्टॅटिकचे संस्थापक आणि सीईओ अक्षित बन्सल यांनी सांगितले. एनपीसीएलने आमच्या प्रगत मानकांवर, अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आणि कोणत्याही स्केलची ईव्ही चार्जिंग स्टेशन्स उभारण्यासाठी आणि ऑपरेट करण्यासाठी कुशल कर्मचारी यांच्यावरील विश्वासामुळे आमच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

रशियाची पेट्रोल निर्यातीवर तात्पुरती बंदी

मॉस्को. वाढत्या देशांतर्गत दर स्थिर ठेवण्यासाठी आणि देशाचा इंधन पुरवठा सुधारण्याच्या प्रयत्नात रशियाने पेट्रोल आणि डिझेलच्या निर्यातीवर तात्पुरती बंदी घालण्याची घोषणा केली आहे. मात्र, हे निर्बंध कधी संपणार याची माहिती सरकारने दिलेली नाही. रशियाच्या या निर्णयामुळे जागतिक बाजारपेठेत इंधनाचे दर वाढण्याची शक्यता आहे. रशिया दररोज सुमारे 9,00,000 बॅरल डिझेल आणि 60,000 ते 1,00,000 बॅरल पेट्रोल निर्यात करतो. 'तास'च्या वृत्तानुसार, बंदीच्या घोषणेनंतर देशांतर्गत इंधनाचे दर सुमारे चार टक्क्यांनी घसरले आहेत. ही बंदी आर्मेनिया, बेलारूस, किरगिझस्तान आणि कझाकस्तान या रशियाच्या नेतृत्वाखालील व्यापार समूह 'युरेशियन इकॉनॉमिक युनियन'मध्ये समाविष्ट असलेल्या इतर देशांना लागू होणार नाही.

साखरेच्या किंमतीवर आता येणार नियंत्रण

केंद्र सरकारने घेतला 'हा' निर्णय

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. साखरेच्या वाढत्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि साठेबाजीला आळा घालण्यासाठी सरकारने व्यापारी, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते, प्रक्रिया करणाऱ्यांना दर आठवड्याला साखरेचा साठा जाहीर करणे बंधनकारक केले आहे. या व्यापाऱ्यांना प्रत्येक सोमवारी https://esugar.nic.in या पोर्टलवर भेट देऊन त्यांच्या साखर साठ्याची माहिती अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाला द्यावी लागणार आहे. देशातील साखरेच्या किमती नियंत्रित करण्यात सरकारला यश आल्याचे अन्न ग्राहक मंत्रालयाने म्हटले आहे. मात्र साखरेच्या दराबाबत साठेबाजी आणि अफवा रोखण्यासाठी साठा जाहीर करणे आवश्यक झाले आहे. दर आठवड्याला हा साठा जाहीर केल्यास साखरेच्या किमती नियंत्रित ठेवण्यास मदत होईल, असे सरकारचे म्हणणे आहे.

साठेबाजी आणि अफवा रोखल्यास ग्राहकांना परवडणाऱ्या दरात साखर उपलब्ध होण्यास मदत होईल. स्टॉकचे निरीक्षण करून, सरकारला बाजारातील कोणत्याही संभाव्य फेरफारविरुद्ध कारवाई करणे सोपे जाईल, असे सरकारने म्हटले आहे.

...तर कडक कारवाई होणार

साखरेचा साठा जाहीर करणे बंधनकारक केल्यानं सरकारला साखरेच्या साठ्याचा रिअल टाईम डेटा मिळू शकणार आहे. सर्व माहिती मिळाल्यामुळे सरकारला आवश्यक असल्यास कोणतीही धोरणात्मक कारवाई करणं शक्य होणार आहे. दरम्यान, यामुळे नियमांचे पालन न करणाऱ्या साखर कारखानदारांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. ऑगस्ट 2023 अखेर 83 लाख मेट्रिक टन साखरेचा साठा होता. ऑक्टोबरपासून गाळप सुरू झाल्यानंतर देशात साखरेचा पुरेसा साठा असेल आणि सणासुदीच्या काळात साखरेचा तुटवडा भासणार नाही. सरकारने 13 लाख मेट्रिक टन साखर खुल्या बाजारात विक्रीसाठी आणली आहे. आगामी काळात आणखी कोटा जारी केला जाऊ शकतो. त्यामुळे ग्राहकांना वाजवी दरात साखर उपलब्ध करून देण्याची शक्यता आहे.

बहुप्रतीक्षित निर्णय ● भारतीय बाजारात ३० अब्ज डॉलर्सची भर पडण्याचा अंदाज

जेपी मॉर्गनच्या बॉंड इंडेक्समध्ये भारत

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. भारतीय बाजाराला जवळपास दोन वर्षे वॉचलिस्टमध्ये ठेवल्यानंतर जेपी मॉर्गनने अखेर भारताचा सरकारी बॉंड इंडेक्स-इमर्जिंग मार्केट्स निर्देशांकात समावेश करण्याचा निर्णय घेतला. या बहुप्रतीक्षित निर्णयामुळे भारताचा कर्ज घेण्याचा खर्च कमी होईल. या बॉंड निर्देशांकांमध्ये भारताचा समावेश केल्याने रुपया अधिक स्थिर होण्यास, व्याजदर कमी ठेवण्यास, रोखे उत्पन्न कमी करण्यात मदत होणार आहे. परिणामी कर्ज घेण्याच्या खर्चात घट झाल्यामुळे कंपन्यांच्या बॉटमलाईनला चालना मिळणार आहे.

तसेच यामुळे भारतीय बाजारात 30 अब्ज डॉलर्सपर्यंत ओघ वाढू शकणार असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. इमर्जिंग मार्केट डेट इंडेक्समध्ये बहुप्रतिक्षित भारत बॉंडचा समावेश केला जात असल्याचे शुक्रवारी जाहीर करण्यात आले. यामुळे भारतातील रोखे बाजार अधिक वाढेल आणि सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून अब्जावधी डॉलर्सची उलाढाल होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

परदेशी निधीचा ओघ वाढणार

भारतामध्ये परदेशी निधीचा ओघ सुरु होईल. भारताचा कर्ज घेण्याचा खर्च कमी होईल. यामुळे जगातील पाचव्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेत अब्जावधी डॉलर्सच्या गुंतवणूकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

हसन अलीचे कमबॅक, नसीम शाहचा पत्ता कट

विश्वचषकासाठी पाकिस्तानच्या शिलेदारांची घोषणा

कराची, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आगामी वनडे विश्वचषकासाठी संघाची घोषणा केली आहे. बाबर आझमच्या नेतृत्वातील संघामध्ये हसन अली याचे कमबॅक झालेय. जवळपास दीड वर्षांनतर हसन अलीने पाकिस्तान संघात कमबॅक केले आहे.

दुखापतीमुळे नसीम शाह विश्वचषक स्पर्धेला मुकणार आहे. आशिया चषक स्पर्धेत नसीम शाह याला दुखापत झाली. शाहीन शाह आफ्रिदी, हॅरिस रौफ आणि सलमान आगा पाकिस्तान संघाचा भाग आहेत. शादाब खान याच्याकडे उप कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आले. पाकिस्तानच्या सर्वोत्तम गोलंदाजांच्या यादीत नसीम शाहचा समावेश आहे. मात्र दुखापतीमुळे तो स्पर्धेबाहेर गेला आहे. शुक्रवारी पाकिस्तानने संघाची घोषणा केली. नसीम शाह याच्या अनुपस्थितीत संघाने हसन अली याच्यावर विश्वास दाखवला आहे. हसन अलीने जवळपास दीड वर्षाने संघात कमबॅक केले. जानेवारी 2022 मध्ये त्याने अखेरचा सामना खेळला होता. तेव्हापासून तो पाकिस्तान संघाबाहेरच आहे. हसन अली याने 60 वनडे सामन्यात 91 विकेट घेतल्या आहेत.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने हटके अंदाजात विश्वचषकात खेळणाऱ्या संघाची घोषणा केली. पीसीबीने आपल्या अधिकृत एक्स (ट्विटर) खात्यावर व्हिडीओ पोस्ट करत संघाची घोषणा केली. कर्णधार बाबर आझमसह फखर जमान, इमाम-उल-हक आणि मोहम्मद रिझवान हे देखील संघात आहेत. इफ्तिखार अहमद आणि सलमान आगा यांच्यावरही निवड समितीने विश्वास व्यक्त केला आहे. युवा खेळाडू मोहम्मद हॅरीस आणि सौद शकील हे देखील संघात आहेत. आशिया चषक 2023 मध्ये पाकिस्तानची कामगिरी फारशी चांगली झाली नाही.

पाकिस्तानचे शिलेदार

फखर जमान, इमाम-उल-हक, अब्दुल्ला शफीक, बाबर आझम (कर्णधार), मोहम्मद रिझवान, सौद शकील, इफ्तिखार अहमद, सलमान अली आगा, शादाब खान, उसामा मीर, मोहम्मद नवाज, शाहीन शाह आफ्रिदी, हॅरिस रौफ, मोहम्मद वसीम ज्युनियर, हसन अली.

जाहीर निवेदन

तमाम लोकांना या जाहीर निवेदनाने कळविण्यात येते की, आमचे अशिल रूपाली प्रमोद खडे रा. जळोची, ता. बारामती, जि. पुणे यांचेतर्फे जाहीर निवेदनान प्रसिध्द करणेत येते की, आमचे अशिलांनी गांव मौजे जळोची, ता. बारामती येथील गट नं. १३४ ब/१ प्लॉट नं. ५ ते ७ मध्ये बांधलेल्या लक्ष्मीदत्त व्हिलेज विंग ए या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं १४ चा साठेखत करारनाम्याचा दस्त नं २८०७/२०१२ अन्वये दि. २२/०३/२०१२ रोजीचा तसेच खरेदीखताचा दस्त नं. ७९८१/२०१२ दि. २३/०८/२०१२ रोजीचे दोन्ही दस्त बारामती सब रजिस्ट्रर ऑफिसमध्ये नोंदविलेला होता व आहे. परंतु सदरील साठेखत करानाम्याचा व खरेदीखताचा दस्त हा मलगुंडे नगर जळोची, भिगवण रोड, बारामती येथे गहाळ झालेले आहेत. सदर दस्त गहाळ झालेबाबत हरविलेल्या मालमत्ता क्र. ९७५५/२०२३ अन्वये बारामती ग्रामिण पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविलेली आहे. सदरचा दस्त कोणास आढळल्यास किंवा मिळून आल्यास त्याचा दुर उपयोग करू नये. खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत संबंधीत कागदपत्र व पुराव्यासह आमचेकडे लेखी हरकत कळवून पोहोच घ्यावी. सबब तमाम लोकांना या जाहीर निवेदनाने कळविण्यात येते की, सदरचा दस्त कोणास सापडलेस अगर मिळून आलेस सदरचा दस्त आमचे अशिलांना परत करणेकामी खाली नमूद पत्त्यावर अथवा मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा. येणप्रमाणे जाहीर निवेदन असे.

सही/-
ॲड. बाळासाहेब पी. वायसे
ऑ.नं. ८, शालीमार कॉर्नर, भिगवण रोड, ता. बारामती जि. पुणे
मो.नं. ७५८८९४५९९४

PUNE METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY, PUNE

E-Tender Notice No. 16 for FY 2023-24
Corrigendum

Tender notice no. 16 please read as follows
Last date for submission of the proposal is, 10th October 2023 upto 15.00 Hrs. instead of 10th September 2023 upto 15.00 Hrs.

-sd-
Chief Engineer
Pune Metropolitan Region Development Authority, Pune.

IndoStar Home Finance Private Limited
Regd. Office: - Unit No. 305, 3rd Floor, Wing 2/E, Corporate Avenue, Andheri- Ghatkopar Link Road, Chakala, Andheri (East), Mumbai – 400093
CIN : U65990MH2016PTC271587 **Tel:** +91 22 45107701
Email: contact@indostarhfc.com; **Website:** www.indostarhfc.com

सूचना

मास्टर डिरेक्शन- नॉन बँकिंग फायनान्शिअल कंपनी-हाऊसिंग फायनान्स कंपनी (रिझर्व्ह बँक) निर्देश, २०२१ च्या परिच्छेद ९३ च्या अटीअंतर्गत याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, कंपनीचे शाखा कार्यालय पत्ता: **दुकान नं. २, दुसरा मजला, चव्हाण कॉम्प्लेक्स, गेट नं. २०३३, शिक्रापूर, पुणे, महाराष्ट्र-४१२२०८ पिन कोड-४१२२०८** ही शाखा जवळचे शाखा **कार्यालय क्रमांक ५२५, गेरा इम्पेरियम अल्फा, राजाराम पाटील नगर, खराडी, ग्रँट रोड, खराडी- ४११०१४.** येथे स्थानांतरित करण्यात येत असल्याने दि. २०.१०.२०२३ रोजी व्यावसायिक कामकाजाच्या समाप्तीपासून बंद करण्यात येत आहे. कोणत्याही प्रकारच्या सहाय्यासाठी तुम्ही वरील निर्देशित जवळच्या शाखा कार्यालयाशी संपर्क साधू शकता किंवा connect@indostarhfc.com येथे ई-मेल लिहू शकता. सदर सूचना कंपनीची वेबसाइट www.indostarhfc.com येथून प्राप्त करता येऊ शकेल.

इंडोस्टार होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडकरिता
सही/-
निधी सदानी
कंपनी सचिव

दिनांक : २२.०९.२०२३

केनरा बैंक Canara Bank
A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

एआरएम-२ शाखा, मुंबई ३रा मजला, कॅनरा बँक इमारत, अदी मर्झबान स्ट्रीट, बालार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१. **दूर.** : ०२२-२२६५११२८/२९ **ई-मेल :** cb6289@canarabank.com

विक्री सूचना

सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंमट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदी अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिताची ई-लिलाव विक्री सूचना.

सर्व जनतेस व विशेषतः कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोकडे गहाण खालील विवरणीत स्थावर मालमत्ता जिचा ताबा कॅनरा बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे घेण्यात आला होता, त्या मालमतेचे **मे. स्पाइरो लाईफकेअर प्रायव्हेट लिमिटेड,** बी-२०८/२०९, क्लासिक सेन्टर, प्लॉट क्र. २६, महाल इंडस्ट्रीअल इस्टेट, ऑफ महाकाली गुंफा रोड, अंधेरी (पू.), मुंबई ४०००९३ त्यांचे संचालक हमीदाऱ्यांच्या प्रतिनिधीद्वारे संचालक / हमीदार **श्री. संजीव अनंत गुप्ते, श्री. राजेश श्रीपाद घांगुर्डे, श्री. विनोद अनंत दली व श्री. हितेश परमानंद असरानी** यांच्या प्रतिनिधित्वांतर्गत यांच्याकडून कॅनरा बँक एआरएम २ मुंबई शाखेस देय दि. **२५.१०.२०२३** रोजी थकबाकी **रु. १३,७१,३०,९२३.७९** (दि. **३१.०७.२०२३** रोजीनुसार अधिक त्यावरील पुढील व्याज व प्रभार) या रकमेच्या वसुलीसाठी जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जी काही आहे तेथे आहे तत्त्वावर विकी करण्यात येत आहे.

अनु. क्र	मालमत्तेचे विवरण	राखीव मूल्य	इसारा रक्कम ठेव
१	मालमत्तेचा सर्व भाग व भूखंड व इमारतीचे मोजमापित १२००० चौ. मीटर, बिल्ट अप क्षेत्र, ३१३२.७३ चौ. मीटर, धारक स्थित प्लॉट क्र. एफ-१/२, एमआयडीसी जेजुरी, अतिरिक्त जेजुरी इंडस्ट्रीअल एरिया, शालिना लेबॉटरीजवळ, जेजुरी निरा रोड, गाव जेजुरी, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे- ४२१३०३ महाराष्ट्र, **मे. स्पाइरो लाईफकेअर प्रायव्हेट लिमिटेड** यांच्या नावे.	रु. ७,६२,००,०००.००	रु. ७६,२०,०००.००

इसारा रक्कम ठेव दि. **२०.१०.२०२३** रोजी सायं. ५.०० वा. वा तत्पूर्वीपर्यंत जमा करावी.
इरठेची माहिती व इतर कागदपत्रे दि. **२०.१०.२०२३** रोजी सायं. ५.०० तत्पूर्वीपर्यंत सेवा प्रदात्यांकडे जमा करता येतील, ज्या तारखेला बँकेकडे जमा करावयाची तारीख दि. **२०.१०.२०२३** रोजी सायं. ५.०० वा. अशी आहे. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तीकरिता कृपया कॅनरा बँकेच्या वेबसाइटवर (www.canarabank.com) दिलेली ई-ऑक्शन लिंक पाहावी किंवा श्री. पारितोष कुमार, मुख्य व्यवस्थापक, कॅनरा बँक, एआरएम २ शाखा, मुंबई (दूर. क्र. (०२२) २२६५११२८/२९, मोबा. नं. ८८२८३२८२१७) वा श्री. सुमित कुमार, व्यवस्थापक (मोबा. नं. ९३४५३३२३२३), ई-मेल आयडी: cb6289@canarabank.com यांना कोणत्याही कार्यदिवशी कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा किंवा सेवा प्रदाते मे. सी१ इंडिया प्रा. लि., उद्योग विहार, फेज – २, गल्फ पेट्रोकेम बिल्डिंग, इमारत क्र. ३०१, गुरगाव, हरयाणा १२२०१५ श्री. हरेष गोवडा मोबा. क्र. ९५१४५१७५५५ (संपर्क क्र. + ९११ २४४३०२०२०/२१/२२/२३/२४), ई-मेल support@bankeauctions.com, maharashtra@c1india.com येथे संपर्क साधावा.

दिनांक : २२.०९.२०२३ सही / –
ठिकाण : मुंबई **प्राधिकृत अधिकारी**
कॅनरा बँक, एआरएम- २ शाखा

Adv. Jitendra B. Solanki

PUBLIC NOTICE
IN THE COURT OF CIVIL JUDGE
(SENIOR DIVISION), THANE AT THANE

Civil Miscellaneous Application No. 763 of 2023 Exh No. 07
Mr. Yash Pulkeshin Mathadhikari Age: 25 years, Occ: Service, Residing at: 1304, 13th Floor, Satguru Solitaire, Ghodbunder Road, Kasarvadavli Naka,Thane (West), Thane - 400615 **...Applicant**
Versus
Nil **...Respondent**

The Petitioner above named whose father who was known by name Pulkeshin Vyankatesh Mathadhikari expired / died on 06/02/2021. The deceased has left behind the following movable and immovable property which description is as follows:

No.	Description of Properties	Amount in Rs.
1.	**IMMOVABLE PROPERTIES:** a) Flat no. 1304, 13th Floor, Satguru Solitaire, Ghodbunder Road, Kasarvadavli Naka, Thane (West), Thane - 400615, having area adm. 614 Sq. feet Carpet, 57.06 sq. mtrs along with one basement car parking space of 9.29 sq. mtrs, i.e. B-49.	90,00,000/-
	b) Residential Unit No. 1306, in Building no. B5, 13th Floor, of Area adm. 508.22 Sq. feet carpet area + attached terrace of 34.44 Sq.ft, holding share certificate distinctive no. 16961 to 16970, as per Deed of Confirmation dated 04.02.2019, registered with Sub Registrar Assurances, Haveli no.10, Pune, bearing registration no. 2699/2019.	35,00,000/-
2.	**MOVABLE PROPERTIES:** i) Maruti Suzuki Baleno Car, bearing Registration no. MH-47-W-2544, Chassis no. MBHEWB22SHF133758.	5,00,000/-
	ii) UTI Mutual Fund Units total no. 1883.431 in Unique Client Code no. MFUTIB0048, Folio No. 523305822186.	1,00,000/-
	Total Amount	**1,31,00,000/-**
		(Rupees One Crore Thirty One Lac Only)

By this notice the Petitioner declares that he has preferred the application seeking grant of the Heirship Certificate in respect of the above mentioned property. Any person who is having any right, interest, claim of whatsoever nature by way of transfer, assignment, gift, court decree, charge, lien, or otherwise in respect of the said property shall lodge his/her/their written objection along with documents within a period of 30 days from the date of publication of this notice. Any claims received after the specified time limit will not be entertained and the Petitioner will not be under any obligation of whatsoever nature for the claims which will be received after the time limit. Given under my hand and seal on this 17/08/2023.

Sd/-
Clerk
Civil Judge (S.D.), Thane

Court Seal

By Order
Sd/-
Asst. Superintendent
Civil Judge (S.D.), Thane

शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई

जावक के बसुस / एमएसपी /९८/२०२३

जाहीर मागणी नोटीस **विशेष वसुली अधिकारी**

संलग्न, शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई

शाखा कार्यालय : शॉप नं. ९,१० दुसरा मजला, लक्ष्मी हाईट्स, कारणारी चौक, कसबा, बारामती ता. बारामती जि पुणे

या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई चे खाली नमुद केलेले कर्जदार/जामीनदार यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड मुदतीत न केलेने संस्थेने त्यांचेविरूद्ध मा. सहा. निबंधक सह. संस्था (परसेवा) बारामती ता. बारामती यांचेकडून संस्थेने म. स. से. कायदा १९९० कलम १०१ अन्वये वसूली दाखला मिळविलेला आहे. सदर वसूली दाखल्याच्या आधारे रविधीतांना प्रथम मागणी नोटीस संस्थेकडे सद्या उपलब्ध असलेल्या पत्त्यावर रजि. पोस्टाने पाठविण्यात आल्या. मात्र सदर पत्त्यावर कर्जदार व जामीनदार न मिळाल्याने सदर नोटीस संस्थेकडे परत आली आहे.

अ. क्र.	कर्जदार/ जामीनदाराचे नाव	पत्ता	वसूली दाखला क्र. व दिनांक	नोटीस तारखेस एकूण येणे कर्ज बाकी	वसुली दाखला नमुद व्याजदार
१	श्री. राहुल देवीदास मराडे जामीनदार	मु. फ्लॅट नं. ४०२, बी विंग, मुक्ती विहार अपार्टमेंट, जळोची रोड, सूर्यनगरी बारामती	३६२ ११/०८/२०२३	१५१६७९/-	१५%
२	श्री. प्रकाश मारूती चांदगुडे कर्जदार श्री. संजय किसन घाडगे जामीनदार श्री. अविनाश नानासो चांदगुडे जामीनदार श्री. मारुती साधुबा चांदगुडे जामीनदार	मु. पो. बारामती दुध संघामागे श्रीरामनगर कसबा बारामती जि. पुणे मु. पो. बालकल्याण शाळेजवळ कारभारी नगर कसबा, बारामती ता. बारामती जि. पुणे मु. पो. बारामती, दुध संघामागे श्रीरामनगर कसबा, बारामती जि. पुणे मु. पो. कारवारी नगर कसबा बारामती, ता. बारामती जि. पुणे	३६४ ११/०८/२०२३	३५८५७९/-	१५%
३	श्री. रोहित ज्ञानदेव सोनावणे कर्जदार सौ. राणी रोहित सोनावणे जामीनदार	मु. पो. शेटफळगढे ता ईंदापुर जि. पुणे मु. पो. शेटफळगढे ता ईंदापुर जि. पुणे	३६५ ११/०८/२०२३	२६२७२६/-	१५%
४	श्री. पवन कन्हैयालाल लिलहारे जामीनदार	मु.पी एफ-८, रूम नं. १०२, ए कॉलनी बिल्ट, भादलवाडी ता इंदापुर जि. पुणे	३६७ ११/०८/२०२३	३४२०६७/-	१५%
५	श्री. जेबन जागेबंधु सरकार कर्जदार सौ. लपीका जेबन सरकार जामीनदार	मु. पो. फ्लॉट नं. A/१६ शुभजित अपार्टमेंट हरिकृपा नगर बारामती जि पुणे मु. पो. फ्लॉट नं. A/१६ शुभजित अपार्टमेंट हरिकृपा नगर बारामती जि पुणे	३६८ ११/०८/२०२३	४०४८५०/-	१५%
६	सौ. अनिता संतोष चव्हाण जामीनदार	मु.पो - अमराई, शिवाजीनगर ता बारामती जि.पुणे.	३७० ११/०८/२०२३	३८७४१४/-	१५%
७	श्री जगन्नाथ रंगनाथ गोलांडे जामीनदार श्री महमंद शब्बीर पित्तलवाला जामीनदार	मु.पो - तांदुळवाडी, ता बारामती जि बारामती, जि.पुणे. मु.पो ब्लड बैंक समोर, बुरहानी गल्ली बारामती ता बारामती जि.पुणे.	३७१ ११/०८/२०२३	३४२३१४/-	१५%

वरील सर्व कर्जदार व जामीनदार यांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, त्यांनी त्यांचकडील वर नमुद संपुर्ण कर्जाची थकबाकी रक्कम ही नोटीस प्रसिध्द झालेचे तारखेपासून १५ दिवसाच्या आत संस्थेच्या संबंधीत शाखा कार्